महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ६०

# सयाजीराव गायकवाड आणि शाहू छत्रपती

बाबा भांड



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ६०

# सयाजीराव गायकवाड
# आणि
# शाहू छत्रपती

बाबा भांड

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

सयाजीराव गायकवाड
आणि शाहू छत्रपती
इतिहास
बाबा भांड
●
प्रकाशन क्रमांक - ८०
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : बाबा भांड (सचिव)
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५४ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# सयाजीराव गायकवाड
# आणि
# शाहू छत्रपती

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय सुधारणांत महाराजा सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू छत्रपती या दोन लोकोत्तर राजांचे फार मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यानंतर राजर्षी शाहूंच्या कार्याचे स्मरण महाराष्ट्राने कृतज्ञतापूर्वक जागवले आहे. राजर्षी शाहू छत्रपतींसंबंधी गेल्या तीस-पस्तीस वर्षांत मराठी लेखकांनी सातत्याने चरित्र, संशोधन, भाषणांचे खंड, गौरवग्रंथ, शाहू छत्रपतींचे निवडक आदेश आणि शाहू कालखंडातील कागदपत्रांचे प्रकाशन केले आहे. यातून शाहूंचे सर्व क्षेत्रांतील कार्य लोकांपर्यंत पोहोचले. त्या तुलनेत महाराजा सयाजीराव गायकवाड हे एक तर आम्हाला गुजरात प्रांतातील राजे वाटू लागले असावे. त्यामुळे कदाचित आजच्या फुले-शाहू-आंबेडकर विचारांच्या मंडळींनी त्यांना सामावून घेतले नाही. तसेच इथल्या साहित्यिकांना, विचारवंतांना, चळवळीतल्या आणि राजकारणातील कर्त्या मंडळींनाही विद्यमान चौकटीत त्यांना बसविणे सोईचे वाटले नसावे.

महात्मा फुले, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील या युगपुरुषांना ज्यांचा वरदहस्त लाभला होता, त्या बडोद्याच्या पुरोगामी राजाच्या योगदानाची दखल घेतली गेली नाही. हिंदुस्थानातील सर्व क्षेत्रांतील अनेक हुशार आणि विद्वान मंडळींना त्याकाळात बडोद्यात राजाश्रय लाभला होता. त्यांच्या मदतीने सयाजीरावांनी शिक्षण, प्रशासन, सुधारणा, उद्योगधंदे आणि साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात हिंदुस्थानात अव्वल दर्जाचे काम केले. एवढेच नाहीत तर राष्ट्रीय चळवळीतल्या मंडळींच्या मागे ते एकटे खंबीरपणे उभे राहून त्यांनी मदत केली (सरदेसाई, १९५६, ३-४), हा इतिहासही गेल्या पासष्ट वर्षांत सांगितला गेला नाही. महाराजा सयाजीराव १९३९ साली गेले. त्यांच्यानंतर बडोद्याच्या कर्तृत्वाबद्दल मोकळेपणाने कोणीही फारसे लिहिले नाही, हे आजचे समाजवास्तव आहे.

खरेतर महाराजा सयाजीराव गायकवाड या राजांबद्दल सर्व हिंदुस्थानाने अभिमान बाळगावा असे सर्व क्षेत्रांतील त्यांचे कार्य होते. उदा. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, अस्पृश्यता निवारण, अनेक सामाजिक सुधारणांचा प्रारंभ बडोद्यात झाला. लोकमान्य टिळकांनी लिहून ठेवले आहे की, बडोदा ही स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रयोगशाळा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले, महाराजा सयाजीरावांनी केलेले काही कायदे अमेरिका-इंग्लंडच्या कायद्याहून पुढारलेले आहेत. या पार्श्वभूमीवर शाहू छत्रपती आणि महाराजा सयाजीराव गायकवाड या युगपुरुषांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

## १ : काल परिस्थितीची समानता

एकोणिसाव्या शतकात १८१८ ला मराठेशाही जाऊन हिंदुस्थानसह सर्व महाराष्ट्र ब्रिटिश सत्तेच्या अमलाखाली आला. छोट्यामोठ्या सहाशेहून अधिक संस्थानांवर ब्रिटिश हुकूमत आली. कोल्हापूर आणि बडोदा ही दोन्ही संस्थाने ब्रिटिश अधिपत्याखाली होती. फरक एवढाच शाहूंचे ब्रिटिशांशी संबंध सलोख्याचे होते. महाराज सयाजीरावांचे संबंध म्हटले तर मैत्रीचे, म्हटले तर संघर्षाचे होते. सयाजीरावांची धारणा होती आपण मांडलिक नसून ब्रिटिश सरकारचे मित्र आहोत.

ईस्ट इंडिया कंपनी हिंदुस्थानात व्यापाराची तराजू घेऊन आली आणि व्यापार करता करता फोडा आणि तोडा नीतीचा अवलंब करून येथील राजे-रजवाड्यांना फंदफितुरीच्या शस्त्राने जेरीस आणले. भाऊबंदकीच्या फाशात मराठेशाहीचा एक-एक मासा गळाला लागत गेला. संस्थानिक, राजे, सरदारांना ईस्ट इंडिया कंपनीने मांडलिक रूपाच्या तहनाम्यात बांधून घेतले. यात राजपूत, निजाम, ग्वाल्हेरचे शिंदे, इंदूरचे होळकर आणि कोल्हापूरचे शाहू छत्रपती आणि हिंदुस्थानातील छोटी-मोठी अनेक संस्थाने होती.

त्यावेळचे नेपाळ आणि बडोद्यातील राजांचे ईस्ट इंडिया कंपनीशी केलेले तहनामे मात्र वेगळे होते. बडोद्याच्या गायकवाडांशी झालेला तह/करार हा दोस्तीचा होता. पेशव्यांचे इंग्रजांशी १७७९ साली युद्ध सुरू होते. यावेळी बडोद्याच्या

फत्तेसिंह गायकवाडांनी ब्रिटिश जनरल गाडर्ड यांच्याशी मोठ्या धोरणाने वागून कंपनीशी बचावाचा व चढाईच्या स्वरूपाचा दोस्ती आणि मैत्रीचा तह केला. या तहामुळे बडोदेकर ब्रिटिशांचे मांडलिक न होता दोस्त ठरले. हाच तहनामा ब्रिटिश सरकारने पुढे स्वीकारला. (Chavada १९५५, १२)

## १ : १ सयाजीराव सार्वभौम राजे :

सयाजीराव महाराजांच्या सार्वभौमत्वाच्या पार्श्वभूमीवर लंडन येथील एक उदाहरण सांगता येईल. लंडनच्या अर्नेस्ट इम्र्यॅनुयल स्टॅथम नावाच्या माणसाने सयाजीराव गायकवाडांना धमकी दिली. आपले माझ्या बायकोशी वाईट संबंध आहेत. अठ्ठेचाळीस वर्षांचे सयाजीराव स्वच्छ चारित्र्य आणि कोणत्याही व्यसनापासून मुक्त होते. मध्यस्थाने सांगितले, स्टॅथम या कारणाने पत्नीपासून घटस्फोट घेणार आहे. या प्रकरणात महाराजांचे नाव टाळण्यासाठी त्याने मोठ्या रकमेची मागणी केली. सयाजीरावांनी वकिलांचा सल्ला घेतला. स्टॅथम पती-पत्नीची माहिती काढली. श्रीमंत प्रतिष्ठित गिऱ्हाइकास जाळ्यात अडकवणे हा त्यांचा धंदा होता. हिंदुस्थानातील अनेक राजपुत्र-राजे बळी पडले होते.

सयाजीरावांचा स्वत:च्या वागण्याबद्दल विश्वास होता. ते वकिलास म्हणाले, त्या धमकीकडे दुर्लक्ष करा. स्टॅथमने चिडून स्वत:च्या पत्नीविरुद्ध घटस्फोटाचा दावा न्यायालयात दाखल केला. सयाजीराव अभ्यासू होते. कायद्याचा अभ्यास होता. ते वकिलास म्हणाले, ‘‘मी हिंदुस्थानातील सार्वभौम

राजा Sovereig Ruler आहे. सार्वभौम राजा विरुद्ध लंडनच्या कोर्टात दावा चालविता येत नाही, असा हायकोर्टात अर्ज करा.'' वकिलाने लंडन हायकोर्टात अर्ज करताच, न्यायमूर्तींनी इंडिया ऑफिसकडे संबंधित कागदपत्रांची मागणी केली. लंडनमध्ये चर्चा सुरू झाली. ईस्ट इंडिया कंपनी आणि बडोद्यातील तहाचा मूळ मसुदा हायकोर्टासमोर आला. हायकोर्ट न्यायमूर्ती सी. मॉन्टेग्यू लश यांनी नि:संशयाने सयाजीरावांचा दावा मान्य केला.

सयाजीराव बडोद्याचे सार्वभौम राजे आहेत. हायकोर्टाचा निर्णय ऐकून लंडन व हिंदुस्थानात वादळ उठले. ब्रिटिश सरकारने सुप्रीम कोर्टाकडे दाद मागितली. इंडिया ऑफिसने सयाजीरावांविरुद्धचे देशद्रोही कार्यवाहीचे पुरावेही दाखल केले; पण अपीलेट न्यायमूर्ती बारग्लोअर डीन यांनीही सयाजीरावांच्या बाजूनेच कौल दिला. (Fatesingrao 248) सयाजीरावांना पदच्युत करण्याच्या तयारीत असलेली बलाढ्य ब्रिटिश सत्ता काहीकाळ हात चोळत बसली. या सुमारात पहिले महायुद्ध सुरू झाले आणि ब्रिटिश सरकारला हिंदुस्थानातील सर्व राजे-रजवाडे यांच्या मदतीची गरज निर्माण झाली. हुशार सयाजीरावांनीही छत्रपती शिवरायांची रणनीती अवलंबून हे प्रकरण फार ताणले नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत जगातील कोणत्याही देशात सरकारचा शिक्षणाशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. याचा अर्थ प्रजेला शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी मानली जात नव्हती.

देशात शांतता राखणे, शत्रूपासून प्रजेचे रक्षण करणे ही सरकारची प्रमुख कामे होती. सर्व जगावर राज्य करणाऱ्या इंग्लंडमध्येही हीच स्थिती होती. त्या काळात इंग्लंडमध्ये सरकार शिक्षणावर छदामही खर्च करत नव्हते. सर्वत्र शाळा, कॉलेज आणि विद्यापीठ होते; पण त्यात श्रीमंत अन् सरदारांच्या मुलांसाठी मोठे शुल्क घेऊन शिक्षण दिले जाई. (घाटे, १९६१, २८४-५) हिंदुस्थानातही पंतोजीच्या अशाच शाळा होत्या. श्रीमंत आणि मोठ्यांची मुले इथे शिकत. या परिस्थितीत १८५१ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढणारे जोतिबा फुले हे काळाच्या पुढे दृष्टी असलेले समाजपुरुष होते.

महात्मा फुल्यांनी स्वत:च्या खर्चाने मुलींसाठी शाळा सुरू केली. या काळात पुणे-मुंबईत उच्चवर्णीय व श्रीमंतांसाठी कॉलेजशिक्षण सुरू झाले होते; पण गरिबांना इथे संधी नव्हती. विद्या सामान्य वर्गाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचत नव्हती. सामान्यांच्या शिक्षणाचा विचार करण्यासाठी १८८२ साली हंटर कमिशन नेमले गेले. या कमिशनपुढे साक्ष देताना समाजातील एक वर्ग म्हणत होता, शहरातील उच्चवर्गीय वर्गाला प्रथम इंग्रजीतून शिक्षण द्यावे; ते शिकल्यानंतर खेड्यातील बहुजनांना निदान बारा वर्षांपर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करा.''

इंग्लंडमध्येही १८८२ पर्यंत सरकारी खर्चाने सामान्यांना शिक्षण मिळत नसे. त्या सुमारास पार्लमेंटमध्ये गरिबांचा कैवार घेणारा एक वर्ग सरकारच्या खर्चाने सगळ्यांना शिक्षण मिळावे

अशी मागणी करू लागला आणि १८८२ ला इंग्लंडमध्ये सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास झाला. ही गोष्ट बडोद्याचे तरुण राजे सयाजीराव गायकवाड यांनी हेरली. एक वर्षांपूर्वीच १८८१ ला या राजाने बघितले, बहुतांश रयत गरीब आणि अडाणी होती. अस्पृश्य आणि आदिवासींची स्थिती तर आणखी वाईट होती. सोनगडच्या जंगलात आदिवासींची संख्या मोठी होती.

घोड्यावर बसून सयाजीराव आदिवासी प्रजेला भेटायला आले. पाड्यावरची ही माणसे भिऊन झाडावर, झुडुपाआड लपून बसली. आतापर्यंत कोणताही राजा या जंगलात प्रजेला भेटायला आला नव्हता. सयाजीरावांनी जंगलातील आदिवासी प्रजेची चौकशी केली. राज्याला घाबरून काळी प्रजा पुढे येत नाही, हे त्यांना सांगण्यात आले. या भागात अस्पृश्य लोकांची बरीच वस्ती होती. त्यांची ही दुरवस्था त्यांनी बघितली. बडोद्याच्या एकूण लोकसंख्येच्या दहा-अकरा टक्के आदिवासी-अस्पृश्यांची वसती होती. ते सर्व खूप मागासलेले होते. दारिद्य्र आणि शिक्षणाच्या अभावामुळे ही सारी प्रजा दुःखद रानटी जीवन जगत होती. त्यांना बघून, या तरुण राजाला खूप वाईट वाटले.

बडोद्यास परतताना सयाजीरावांनी मनाशी निर्णय घेतला. या अस्पृश्य-आदिवासींना अगोदर शिकविले पाहिजे आणि अस्पृश्य आणि आदिवासींच्या शिक्षणासंबंधी पहिला हुकूम काढला. सरकारी खर्चाने या मुलांसाठी शाळा-वसतिगृहे सुरू

केली. वंचित समाजाच्या परिवर्तनासाठी शिक्षण देणारा हा हिंदुस्थानातील नव्हे तर जगातील पहिला समाजक्रांतिकारी हुकूम होता. यावेळी हे तरुण राजे होते केवळ एकोणीस वर्षांचे! एवढेच नाही तर यानंतर दहा वर्षांतच १८९२ साली महाराजा सयाजीरावांनी बडोद्यात सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले. हाही हिंदुस्थानातील पहिला निर्णय होता. या दोन्ही घटना म्हणजे शिक्षणाने समाजपरिवर्तन करणाऱ्या समाजक्रांतिकारी बदलाची नांदी ठरल्या.

## १ : २ दोन्ही राजांचा कालखंड :

महाराजा सयाजीराव आणि शाहू छत्रपती या दोन युगपुरुषांचा बराचसा कालखंड समकालीन असा होता. शाहू छत्रपती २६ जून १८७४ ला जन्मले. १८ मार्च १८८४ साली दहाव्या वर्षी त्यांचे दत्तकविधान आणि राज्यारोहण झाले. शिक्षणानंतर १८९४ साली विसाव्या वर्षी त्यांच्या हाती प्रत्यक्ष राज्यकारभार आला आणि आजाराने ६ मे, १९२२ साली त्यांचे दु:खद निधन झाले. शाहू छत्रपती ४८ व्या वर्षी गेले. केवळ अठ्ठावीस वर्षं ते राज्यकारभार करू शकले.

सयाजीरावांचा जन्म ११ मार्च, १८६३ ला झाला. ते शाहू छत्रपतीहून अकरा वर्षांनी मोठे होते. २४ मे, १८७५ साली वयाच्या बाराव्या वर्षी सयाजीरावांचे दत्तकविधान आणि राज्यारोहण झाले. सहा वर्षांच्या शिक्षणानंतर २८ डिसेंबर, १८८१ साली राज्याधिकारप्राप्ती झाली आणि प्रदीर्घ आजारानंतर ६ फेब्रुवारी,

१९३९ साली शाहत्तराव्या वर्षी सयाजीरावांचे देहावसान झाले. सुदैवाने सयाजीरावांना चौसष्ट वर्षांचा प्रदीर्घ काळ राजगादीवर राहण्याची संधी लाभली.

सयाजीराव आणि शाहू दोघेही दत्तकपुत्र म्हणून बडोदा आणि कोल्हापूरच्या गादीवर आले. नाशिक जिल्ह्यातील कवळाणा गावच्या काशीराव गायकवाडांचा बारा वर्षांचा गोपाळ योगायोगाने बडोद्याचा राजा बनला. खेड्यातील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबासारखी परिस्थिती होती आणि गोपाळला तर शिक्षणाचा गंधही नव्हता. याउलट शाहू छत्रपती हे कागलच्या सुस्थितीतील सरदार घराण्यातील पुत्र होते. दत्तकविधान होताच या दोन्ही युवराजांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. सयाजीरावांना भाऊ मास्तर आणि ब्रिटिश शिस्तीत वाढलेले मि. इलियट या शिक्षकांचे उत्तम मार्गदर्शन लाभले, तर शाहूंना रघुनाथ सबनीस आणि प्रेजर हे चांगले गुरू मिळाले. सुदैवाने सयाजीरावांना शाहू छत्रपती अगोदर तेरा वर्षे आणि नंतर सतरा वर्षे राज्यकारभार करण्याची संधी लाभली.

राज्यकारभार हाती येताच सहाव्या वर्षी १८८७ ला सयाजीरावांनी पहिला विलायत प्रवास केला. त्यावेळी ते चोवीस वर्षांचे होते. अर्ध्या जगावर राज्य करणारे इंग्लंड बघण्याची त्यांना उत्सुकता होती. त्यांचे गुरू मि. इलियटसर बरोबर होते. इलियट यांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्या विलायत प्रवासाची नीट आखणी केली. सयाजीरावांनी युरोपातील शाळा, कॉलेजेस,

उद्योगधंदे, प्रगती आणि सामाजिक सुधारणांचा बारकाईने अभ्यास केला. स्वत: नोंदी घेतल्या. बरोबरच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या. जे-जे इथे चांगले दिसले, वाटले ते-ते आपल्या बडोदा राज्यात सुरू करायचे, या विचाराने सयाजीराव बडोद्यात परतले. पहिल्या विलायत भेटीचा अहवाल तयार करविला. प्रवासखर्चासह वृत्तांत छापून घेतला. विलायतेतील रस्ते, बागा, इमारती बांधणारे तज्ज्ञ तसेच शिक्षण, ग्रंथालय विषयातील मंडळींना ते टप्प्याटप्प्याने बडोदा सेवेत बोलावू लागले.

बडोद्यातील बहुतांश प्रजा शेतकरी होती. शेती हा मुख्य व्यवसाय होता. शेतीसंबंधी पहिला निर्णय घेतला. शेती भूमापन व पाहणी Land Survey Settelment हे नवे खाते सुरू केले. जमिनीची मोजणी करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नानुसार नव्याने शेतसारा आकारणी केली. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, गाव तेथे ग्रामपंचायत आणि पंचायतींना निर्णय घेण्याचे अधिकार, शाळा सुटलेल्या मुला-मुलींची साक्षरता टिकण्यासाठी गाव तेथे वाचनालय, पाठ्यपुस्तकांची निर्मिती, शेती-पाण्याच्या सोई, रस्ते - धर्मशाळांची बांधणी, मोफत आरोग्यसेवा ही जनकल्याणाची कामे कायदे करून प्राधान्याने केली.

बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह, सार्वजनिक ठिकाणी व मंदिरात सर्व जातींना प्रवेश, पुरोहितांसाठी कायदा, उत्तम न्यायव्यवस्था, पत्नी-मुलीस कुटुंबाच्या मिळकतीत हक्क हे जनकल्याणाचे कायदे केले. या सामाजिक, धार्मिक, नैतिक

आणि प्रशासकीय सुधारणेसोबत साहित्य, कला क्षेत्रात लक्षणीय काम केले. साहित्यिक, कलावंत, चित्रकार, संगीतकार आणि शिल्पकारांना राजाश्रय दिला. सयाजीराव गायकवाडांनी राज्यकारभार हाती येताच पहिल्या दहा वर्षांत ही सगळी कामे केल्याने देशभर बडोदा राज्यकारभाराची चर्चा सुरू झाली.

कोल्हापुरात शाहू छत्रपतींनी १९०१ साली मागासवर्गीयांना ५० % नोकऱ्यातील आरक्षणाचा क्रांतिकारी निर्णय घेतला. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, लोकशाही कारभारासाठी ग्रामपंचायतींची स्थापना, अस्पृश्यांना दरबारात नोकरी देणे, आंतरजातीय व धर्मीय विवाह नोंदणी, महिलांसाठी काडीमोड कायदा, बलुतेदारी रद्द करणे, गोबंदी हुकूम, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे या सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांचे कायदे कोल्हापूरमध्ये केले.

महाराजा सयाजीराव गायकवाडांना शाहू छत्रपती अगोदर राज्य करण्याची संधी लाभल्याने त्यांच्या आधी पहिल्या दहा-बारा वर्षांत हिंदुस्थानात सर्वार्थाने अग्रणी ठरतील अशा गोष्टी त्यांनी बडोद्यात केल्या. यातील काही समाजोपयोगी व कल्याणकारी योजना शाहू छत्रपतींनी कोल्हापूर संस्थानात समर्थपणे राबविल्या. कोल्हापूर संस्थानचा भौगोलिक विस्तार केवळ एका जिल्ह्यापुरता होता, तर बडोदा राज्याचा विस्तार कोल्हापूरच्या तुलनेने चार-पाच पटीने मोठा होता. याचाही फायदा बडोद्यात अनेक गोष्टी करताना सयाजीरावांना होऊ शकला.

## २ : दोन लोकोत्तर पुरुष : व्यक्तिमत्त्व साम्य-भेद

सयाजीरावांनी स्वत: शिकून शिक्षणाच्या माध्यमातून ब्रिटिश अमदानीत धर्मनिरपेक्ष आधुनिक लोकशाही मूल्यांचा पाठपुरावा करणारा राजा अशी आपली स्वत:ची ओळख निर्माण केली. चक्रवर्ती राजगोपालाचारी म्हणतात. 'हिंदुस्थानात दोन खरे राजे झाले आहेत, ते आहेत शिवाजी महाराज आणि सयाजीराव.' इतिहासाचार्य वि.का. राजवाड्यांनी महाराष्ट्रातील शंभर वर्षांतील कर्तृत्ववान व्यक्तींची यादी केली. यात पहिले नाव होते सयाजीराव गायकवाडांचे. महात्मा गांधींनी येरवड्याच्या सेंट्रल जेलमधून सयाजीरावांना लिहिलेल्या पत्रात म्हटलंय, 'महाराज सयाजीराव गायकवाडांनी बडोदा संस्थानात हरिजनासाठी शिक्षणाची दारं उघडली आणि अस्पृश्तेचा कलंक दूर करून भारतात प्रथमच कायद्याने अंमलबजावणी केली.'

प्रबोधनकार ठाकरे शाहू छत्रपतीसंबंधी लिहितात, 'शाहू छत्रपती हे पट्टीचे राजकारणी, मुत्सद्दी, खंबीर समाजसुधारक, धैर्यवान क्रांतिकारक आणि सक्रिय अस्पृश्योधारक होते.' 'शाहू छत्रपती सामाजिक व धार्मिकदृष्ट्या जहाल; पण राजकीयदृष्ट्या मवाळ किंवा नेमस्त विचारसरणीचे होते,' असे य. दि. घाटे यांनी बडोदा आणि कोल्हापूर संस्थानात शिक्षण विभागात महत्त्वाच्या पदी कार्य केले होते. 'दिवस असे होते' हे पुस्तक त्यांनी लिहिले.

महाराजा सयाजीराव गायकवाड आणि राजर्षी शाहू छत्रपती हे दोघे कर्तृत्ववान युगपुरुष होते. या दोन्ही व्यक्तिमत्त्वात मूळत:

फरक होता. शाहू छत्रपती आणि महाराजा सयाजीरावांची गौरवपूर्ण तुलना करताना त्यात ते लिहितात, बेडर शाहू छत्रपतींना रयतेबद्दल कणव होती, तर सयाजीरावही समतोल विचारांचे होते. शाहू दहा-दहा तास उन्हातान्हात न थकता घोड्यावर बसून डुकरांचा माग काढण्यासाठी रपेट करत, तर सयाजीराव दहा-दहा तास नव्या शास्त्रांचे-पुस्तकांचे वाचन, श्रवण करत जागरण करत. एखादा प्रश्न निर्माण झाला की शाहू ताबडतोब रोखठोक कार्यवाही करत, सयाजीराव मात्र चारचौघांचे मत विचारात घेऊन समतोल निर्णय देत.

शाहू हे प्रत्यक्ष कृती करणारे कृतिवीर होते, तर सयाजीराव मात्र सारासारविचार करून निर्णय घेणारे तत्त्वचिंतक होते. शाहूंना हिंदू असल्याचा, मराठी बाण्याचा अभिमान होता; तसेच ते शिवपूजा करून क्षत्रियत्वाचा अभिमान बाळगणारे होते. याउलट सयाजीराव अज्ञेयवादी, बुद्धीशिवाय कशावरही विचार ठेवत नसत, मात्र प्रजाहितासाठी सर्वकाही करणारे कनवाळू राजा होते. शाहू छत्रपती आपले संस्थान क्वचित सोडीत, तर सयाजीरावांनी आयुष्यभर चोवीस तास डोळसपणे विश्वसंचार केला. ते परदेशात असले तरी त्यांची नजर मात्र सदैव प्रजेकडे होती.

शाहू छत्रपती सर्वसामान्यात सहज मिसळत, सयाजीराव कोणाच्याच जवळ फारसे आले नाहीत. बायको, मुलांना, नातवांना, मित्रांना त्यांनी फारसे जवळ केले नाही. शाहू बहिर्मुखी

होते. ते स्वत:पेक्षा बाह्य जगाचा अधिक विचार करत, तर सयाजीराव अंतर्मुख स्वभावाचे होते. त्यामुळे त्यांच्या अंतरंगाचा धांगपत्ता जवळच्या व्यक्तीलाही लागत नसे. (घाटे, १९६१, २८६-७) सयाजीरावांनी बडोद्यात अगोदर जे-जे कायदे केले, सुधारणा केल्या, तेच काही शाहूंनी कोल्हापुरात केले.

वेदोक्त प्रकरण प्रथम बडोद्यात सुरू झाले; पण सयाजीरावांनी संयमाने ते प्रकरण हाताळले. हिंदुस्थानात मराठीत ब्राह्मणेतरांसाठी पहिली वेदोक्त पाठशाळा बडोद्यात सुरू करून हा प्रश्न सामंजस्याने सोडविला, तर शाहूंनी या प्रकरणात ब्राह्मणांविरुद्ध ठोस कार्यवाही करून तो प्रश्न धसास लावला. सयाजीराव बालपणापासून सर्वजातीपातींच्या सवंगड्यात खेळलेले. गुरे चारताना एकत्र जेवलेले.

त्यामुळे राजा झाल्यानंतर १८७७ साली वयाच्या चौदाव्या वर्षी अहमदाबाद मुक्कामी त्यांनी पंगतीभेद दूर केला. अस्पृश्यता निवारणाचे काम स्वत:पासून सुरू करून कायद्याने अस्पृश्यता दूर करून त्यांना शिक्षण देऊन नोकऱ्या देणारे ते पहिले आहेत. शाहू छत्रपतींनी ब्राह्मणेतर चळवळ हेच एकमेव उद्दिष्ट मानल्याने, त्यांचा संघर्ष त्या काळात महाराष्ट्रात गाजला. बहुजण समाजास सयाजीराव निराकार निर्गुण ब्रह्मासारखे भासले, तर शाहू छत्रपती त्यांचे सावळे ब्रह्म झाले.

## २ : १ शाहू-सयाजीराव नातेसंबंध :

सयाजीराव महाराजांचे ज्येष्ठ पुत्र फत्तेसिंहराव यांचे १९०८ ला चोविसाव्या वर्षी अकाली निधन झाले. फत्तेसिंहांची कन्या इंदुमती चार-पाच वर्षांची झाली आणि सयाजीराव नातीसाठी तोलामोलाचे स्थळ शोधू लागले. शाहू छत्रपतींचे ज्येष्ठ राजपुत्र राजाराम योग्य वर असल्याने सयाजीरावांनी २२/१/१९१० ला शाहूंना पत्र लिहून विनंती केली. पुन्हा एक वर्षांनी त्यांनी पाठपुरावा केला. शाहू आणि महाराणीसाहेब मुंबई मुक्कामी इंदुमतीस बघण्यास येण्याचे ठरवितात. सयाजीराव सुचवितात, येताना राजपुत्र राजाराम यांनाही आणावे आणि त्यांचे आरोग्य टिपणही घेऊन यावे. ही गोष्ट शाहूंना आवडली नाही. शाहू आणि महाराणी राजपुत्रास सोबत न घेता इंदुमतीस बघून गेले. पुढे पाच वर्षे विवाहाची बोलणी सरकली नाही.

सयाजीरावांनी १९१६ ला पुन्हा हा विषय काढला. अंतिम निर्णय कळवा, असा आग्रह धरला. शाहूंनी विवाहासंबंधी बोलणी करण्याचे अधिकार महाराणी लक्ष्मीबाई, त्यांचे बंधू बापूसाहेब घाटगेकडे सोपविले. लक्ष्मीबाईंनी १४/१२/१९१६ ला मुलांच्या आई पद्मावतींना पत्र लिहून कळविले, ‘‘२ लाख हुंडा, १ लाख वरासाठी, १ लाख वधूसाठी, एक गाव वतन, १ लाख वधूस दागिने, ७० हजार रुपये वरखर्चासाठी असे एकूण ६,७०,००० रुपये आम्हास द्यावे.’’ (छत्रपती शाहू पेपर्स खंड-७, २४३). सयाजीरावांनी आपले ज्येष्ठ बंधू व खासेराव जाधवांना मध्यस्थी करून मार्ग काढण्यास सुचविले.

सयाजीराव भाषणातून, बोलण्यातून सांगत असत, ऐपत असलेल्या मंडळींनी लग्नसमारंभाच्या निमित्ताने एक दुसऱ्यांची अडवणूक करू नये. खासेरावांनी प्रयत्न केला; पण हा आकडा कमी न झाल्याने सयाजीरावांनी संमती दिली. अंतिम बोलणी नक्की करण्याचे ठरविले. दरम्यान ११ जुलै, १९१७ ला शाहूंनी खासेरावांना कळविले, 'आम्ही मूळ मागणी अकरा लक्ष रुपयांची केली होती. महाराजांनी ६,७०,००० मान्य केले. यावर एक लक्ष तीस हजार वाढवून द्यावेत. म्हणजे आम्हाला आठ लक्ष मिळावेत.' (उपरोक्त खंड, ३४६). वाढीव मागणीस सयाजीरावांनी खळखळ केली. खासेराव शाहूंचे जवळचे मित्र आणि सयाजीरावांचे विश्वासू अधिकारी-नातेवाईक होते. त्यांनी दोघांना समजावून विवाहाचा मुहूर्त ठरविला.

बडोदा शाही विवाहाच्या तयारीत लागले. वऱ्हाड आले. भव्य स्वागत झालं. शाही विवाह पार पडला. वर-वधूस एक गाव वतन देण्यात तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने, शाहूंनी त्याबद्दल रोख दोन लक्ष रुपयांची मागणी केली. काही पैसे त्याच दिवशी दिले गेले. विवाहानंतरचे विधी पार पडले. शाही वऱ्हाड कोल्हापूरला परतले. एक लक्ष रुपये बाकी राहिले होते. कोल्हापूर दिवाणांनी या रकमेकरिता स्मरणपत्रे पाठविली.

सयाजीरावांना या शेवटच्या बाकी व्यवहाराची कल्पना नव्हती. शाहूंनी याबद्दल सयाजीरावांना कळविले. या पेचप्रसंगात पुन्हा खासेरावांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. देणे बाकी असलेले

एक लक्ष रुपये व विवाहाच्या तारखेपासून त्या रकमेवरचे व्याज शाहूंना देऊन, हा प्रश्न मिटला. (उपरोक्त खंड-५, ५९५).

## २ : २ महाराजा सयाजीरावांचे वेगळेपण :

चौसष्ट वर्षांच्या राज्यकारभारात जवळजवळ बावीस वर्षे सयाजीराव जगप्रवासाच्या निमित्ताने बडोद्याबाहेर राहिले. जगातील सर्व महत्त्वाच्या देशांना त्यांनी भेटी दिल्या. त्या देशाचे वेगळेपण हेरले. जगातील मान्यवर पुढाऱ्यांच्या, विचारवंतांच्या त्यांनी गाठीभेटी घेतल्या. यातून त्यांना विश्वदर्शन घडले. तेथील चांगल्या गोष्टी बडोद्यात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे, हे ओळखलेल्या या प्रज्ञावंत आणि विचारवंत राजाने आयुष्यभर पुस्तकांशी मैत्री केली.

जगभरातून उत्तम ग्रंथ आणून वाचले. स्वत: अभ्यास केला. आशिया खंडातील सर्वांत मोठी 'सेंट्रल लायब्ररी' बडोद्यात उभी केली. स्वातंत्र्यपूर्व काळात पंचाहत्तर हजार लेखी हुकूम काढले. तयार केलेले कायदे छापले. हा हिंदुस्थानच नव्हे तर तो जगातील एका राजाचा साठ वर्षांच्या राज्यकारभाराचा विक्रम होता.

साहित्य, कला, शिल्पकला, संगीत हे समाजसंस्कृतीचे आधारस्तंभ आहेत, हे सयाजीरावांनी ओळखून या सर्व क्षेत्राला सढळ हाताने साहाय्य केले. एवढेच नाही तर कला आणि विज्ञानाचा विकास हे लोकांच्या सर्वांगीण समृद्धीची, प्रगतीची शिडी आहे. त्याकरिता सर्वांना मदत करणे हे राजाचे कर्तव्य

समजून या राजाने आयुष्यभर कलावंतांना, प्रज्ञावंतांना, देशप्रेमी लोकांना आणि क्रांतिकारकांना कोट्यवधींची आयुष्यभर सढळ हाताने मदत केली.

नामदार गोखले, न्या.रानडे, जोतिबा फुले, डॉ. आंबेडकर, सुभाष बाबू, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, म.गांधी, महर्षी शिंदे, योगी अरविंद, पंडित मालवीय, रियासतकार देसाई आणि आणखी हजारोंना बडोद्यातून मदत मिळाली. आजच्या महाराष्ट्रातील ऐंशी टक्क्यांहून अधिक बहुजनांच्या शिक्षण संस्था सयाजीराव गायकवाडांच्या प्रत्यक्ष मदतीने व प्रेरणेने सुरू झाल्या, असा इतिहास आहे.

शाहू छत्रपतींनी वेगवेगळ्या जातींच्या मुलांसाठी वसतिगृह करून शिक्षणाची गंगा गरीब मुलांना उपलब्ध करून दिली. हे कामही फार महत्त्वाचे आहे. बहुजनसमाज शिकला पाहिजे ही त्यांची कळकळ होती. त्यामुळेच भाऊराव पाटलांना त्यांनी मदत केली.

हिंदुस्थानातील एक विचारवंत राजा ही सयाजीरावांची ओळख जगाला होती. त्यामुळेच दुसरी जागतिक सर्वधर्मपरिषद शिकागो, पाचवी जागतिक मानवंश परिषद, ऑक्सफोर्ड लंडन, जागतिक प्राच्यविद्या परिषद, अ.भा. हिंदी साहित्य संमेलन दिल्ली, अ.भा. साहित्य संमेलन कोल्हापूर, अ.भा. आर्यसमाज संमेलन, अ.भा. सामाजिक परिषद मुंबई, अ.भा हिंदी औद्योगिक

परिषद कलकत्ता, अ.भा. अस्पृश्यता निवारण परिषद मुंबई या संमेलनाचे अध्यक्षस्थान सयाजीराव महाराजांनी वेळोवेळी भूषविले होते.

सयाजीराव आपले भाषण लिहून काढीत. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी दिलेली भाषणे मराठी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत बडोद्यात उपलब्ध आहेत. ऑक्सफोर्ड विद्यापीठ लंडन आणि अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठातही त्यांनी अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली होती. देशभर त्यांनी दिलेली शेकडो भाषणे, लिहिलेली हजारो पत्रे, पंचाहत्तर हजारांहून अधिक काढलेले हुकूम, जगप्रवासात लिहिलेली रोजनिशी हे त्यांचं प्रचंड विचारधन आज उपलब्ध आहे. सयाजीराव हे एक राष्ट्रप्रेमी विचारवंत राजा होते; पण तसे चित्र आतापर्यंत समोर आले नाही. (भांड, २०१३ ब, ४)

शिक्षण आणि विज्ञानाच्या माध्यमातून सांस्कृतिक मूल्य असलेलेच राष्ट्र प्रगती करू शकते, अशी सयाजीरावांची दूरदृष्टी होती. तंत्रविद्या ही आजच्या काळाची गरज आहे. यातूनच सर्व क्षेत्रातील प्रगती गाठता येते हे आंतरराष्ट्रीय शतपावली केलेल्या सयाजीरावांनी नेमकेपणाने हेरले होते. छोट्याशा ब्रिटनने शिक्षण आणि विज्ञानाच्या संगतीतून यंत्रतंत्राची कास धरून अल्पावधीत अर्ध्या जगावर साम्राज्य पसरविले.

येत्या काळात हिंदुस्थानासही विज्ञानाची कास धरण्याशिवाय पर्याय नाही, हे सयाजीरावांनी ओळखले. इथल्या विद्यार्थ्यांना

तंत्रशिक्षण देणे गरजेचे आहे. या गरजेतून बडोद्यात कलाभवनाची स्थापना केली. इंजिनिअरिंग, विणकाम, छपाईकला, रंगकला, वास्तुविशारद ह्या तंत्रशिक्षणाची सोय कलभवनात केली. एवढेच नाही तर विलायतेत या विषयांचे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ते बडोद्यातर्फे शिष्यवृत्त्या देऊ लागले. त्या काळात विलायतेत जाऊन बॅरिस्टर होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असे. सयाजीरावांनी त्याऐवजी शेतकी, दुग्धव्यवसाय आणि तंत्रशिक्षणात शिकून या, असा आग्रह धरला. खासेराव जाधव या जवळच्या आप्ताला शेतकी विषयाची पदवी घेण्यास विलायतेला पाठविले. ते शिकून परत येताच बडोद्यात स्वतंत्र शेती खाते सुरू केले. हिंदुस्थानात तोपर्यंत स्वतंत्र शेती खाते नव्हते, रेव्हेन्यू खात्याचा भाग म्हणून शेतकी खात्याकडे पाहिले जाई. त्याकाळात प्रशासन व न्याय हे खाते कलेक्टरकडे होते. त्या काळात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ आणि आय.सी.एस. अधिकारी डॉ. आर. सी. दत्त हे बडोद्याचे दिवाण होते. अहमदाबाद राष्ट्रीय काँग्रेसचे डॉ. दत्त अध्यक्ष होते.

शिक्षण आणि विज्ञानाची कास धरून पन्नास वर्षांपुढील स्वतंत्र भारताचे स्वप्नं बघणारे सयाजीराव दूरदृष्टी राजा होते. त्याचं एक फार महत्त्वाचं उदाहरण सांगत आहे. प्राचीन वाङ्मयाबद्दल सयाजीरावांचा अभ्यास होता. यातून त्यांनी बडोद्यात प्राच्यविद्या संस्था उभारली. १८७ जुन्या संस्कृत ग्रंथाचे संपादन-प्रकाशन करविले.

शिवकर बापूजी तळपदे नावाचे मुंबईचे संस्कृत पंडित होते. आपल्या प्राचीन संस्कृत ग्रंथात विमानबांधणी व उड्डाणसंबंधीची माहिती आहे, हे तळपदेंना माहीत होते. सुबाय्या या संस्कृत पंडिताच्या मदतीने शिवकर तळपदे यांनी जगातील पहिल्या विमानाचा आराखडा केला. विमान प्रयोगाची योजना सयाजीरावांना सांगितली. या प्रकल्पास विज्ञानप्रेमी सयाजीरावांनी सढळ हाताने मदत केली होती.

शिवकरांनी या प्राचीन शास्त्राच्या आधाराने एक विमान तयार केले. त्यास नाव दिले मारुतसखा. ऋग्वेदामध्ये सरस्वतीदेवीसाठी हा शब्दप्रयोग केलेला आहे. मारुत म्हणजे हवेचा झोत आणि सखा म्हणजे मित्र. हवेच्या झोताच्या साहाय्याने उडणारा हा मारुतसखा. याकामी महाराजांनी त्यांना आर्थिक मदत केली. जून १८९५ ला मुंबईच्या चौपाटीवर जगातील पहिल्या विमानाच्या उड्डाणाचे प्रात्यक्षिक ठरले. स्वातंत्र्यप्रेमी सयाजीराव गायकवाड, बाळ गंगाधर टिळक आणि मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे तळपदेंचा प्रयोग पाहण्यास आले. फार मोठी गर्दी जमली. मानवरहित मारुतसखाने पंधराशे फूट उंचीपर्यंत यशस्वी उड्डाण केले. तळपदे या भारताच्या एका संस्कृत पंडिताने प्राचीन तंत्रज्ञानाची मदत घेऊन विमानोड्डाणाचा पहिला प्रयोग यशस्वी करून दाखविला.

भारतीयांची मान जगात उंचावेल अशी ही घटना होती. केसरीचे संपादक बाळ गंगाधर टिळक यांनी या अद्भुत प्रयोगाची प्रशंसा

केली. सयाजीराव गायकवाड आणि न्यायमूर्ती रानडे यांनी तळपदे यांचे अभिनंदन केले. ब्रिटिश सरकारला मात्र ही गोष्ट रुचली नाही. एक भारतीय व्यक्ती वेगळ्या क्षेत्रात काम करतो आणि त्याच्या मागे क्रांतिकारकांना मदत करणारे सयाजीराव आहेत, हा ब्रिटिश सरकारला धोका वाटू लागला.

शिवकर बापूजी तळपदे या शास्त्रज्ञाला ब्रिटिश सरकारने खोटे आरोप लावून अटक केली. त्याला मनोरुग्ण ठरविले. न्या. रानडे, गायकवाड आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींनी ब्रिटिश सरकारवर दबाव आणून तळपदे यांची सुटका केली. या आघाताने तळपदे खचले. त्यातच त्यांच्या पत्नीचे निधन झाल्याने ते मानसिकदृष्ट्याही दुर्बल झाले.

ब्रिटिश सरकारने सयाजीरावांना कळविले की, तळपदे यांना मदत करू नका. नसता गंभीर परिणामास सामोरे जावे लागेल. या गोष्टीमुळे तळपदे यांना खूप वाईट वाटले. जगातील पहिले विमान बनविणे, उड्डाण करणे हा संशोधन प्रयोग दाबला गेला. यानंतर आठ वर्षांनी १९०३ साली राईट बंधूंनी विमानोड्डाणाचा प्रयोग केला. जगातील पहिला महत्त्वाचा महत्त्वाचा प्रयोग ब्रिटिशांच्या कुटिल नीतीने झाकला गेला. याचे फार मोठे दुःख सयाजीराव आणि न्या. रानडे यांना झाले.

## २ : ३ वेदोक्त प्रकरण :

सयाजीराव १८८७ साली युरोप प्रवासास जायला निघाले. त्यावेळी सनातनी हिंदू पंडितांनी राजघराण्यातील वडीलधाऱ्या

मंडळींनी विरोध केला. विलायतेला जाणे म्हणजे काळ्या पाण्यावरचं अनिष्ट वर्तन होतं. यामुळे राजपुरुषास आणि राज्यास संकटास तोंड द्यावे लागेल, असा प्रचार बडोद्यात सुरू झाला. सयाजीरावांनी इलियट सरांच्या मदतीने पहिल्या युरोप प्रवासाची आखणी केली. महाराजांबरोबर स्वारीप्रमुख म्हणून होते सरसुभे रामचंद्र विठोबा धामणस्कर. धामणस्कर हे जोतिबा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. बडोद्यात ते १८८५ साली येण्यापूर्वी इंग्रजांच्या मुलुखात नोकरीत होते. मामा परमानंद न्यायमूर्ती रानड्यांचे वर्गमित्र होते. मामांनी सयाजीरावांकडे धामणस्करांच्या ओळखीतून फुल्यांच्या 'शेतकऱ्याच्या असूड'बद्दल लिहिले. महाराजांनी फुल्यास बोलावून मदत केली. जोतीराव फुल्यांचे कार्यकर्ते धामणस्कर बडोद्यात सरसुभे या पदावर आले.

एका कर्तबगार नव्या विचारांचे अधिकारी म्हणून सयाजीरावांच्या पहिल्या युरोप प्रवासात गेले. या प्रवासाने महाराजांनी इंग्रजी सामर्थ्याची मर्मस्थळे टिपली. बडोद्यात परतताच पुरोहित मंडळींनी प्रायश्चित करवून घेतले. या सगळ्या गोष्टी सयाजीरावांनी मनाविरुद्ध केल्या; पण त्यांनी या प्रथेविरुद्ध कायदेशीर बंदोबस्त करण्याची मनोमन तयारीही केली. याच काळात त्यांच्या मनात राजपुत्रांना इतर शिक्षणासोबत योग्य धार्मिक शिक्षणही दिले पाहिजे, असा विचारही आला. या सुमारास रामजी संतूजी आवटे यांनी 'बडोदा वत्सल'

वर्तमानपत्र सुरू करून सत्यशोधक विचारांचा प्रसार सुरू केला. सयाजीरावांचे राजवाड्यातील धर्मकृत्यासंबंधी असंबद्ध व अनिष्ट गोष्टींकडे लक्ष होतेच. धर्माच्या नावाखाली पुरोहित वर्ग अनिष्ट प्रथा वर्षानुवर्षे आंधळेपणाने लादत आहे, हेही त्यांच्या लक्षात आले. या काळात जोधपूरचे शिवदत्त जोशी बडोद्यात आले. राजवाड्यातील देवघरातील धार्मिक कृत्ये पुराणोक्त पद्धतीने होतात, हे बघून त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले, राजपूत क्षत्रिय आहेत. छत्रपती शिवराय राजपूत वंशाचे म्हणून क्षत्रिय ठरतात. त्यामुळे सर्व मराठ्यांच्या घरात वेदोक्त पद्धतीने धर्मकृत्ये चालली पाहिजेत. मराठ्यांना वेदांच्या पठण-श्रवणाचा अधिकार नाही असे कर्मठ सनातनी म्हणत. मराठे क्षत्रिय नसून ते शूद्र आहेत. त्यामुळे मराठ्यांच्या घरी धर्मकृत्ये आणि विधी वेदोक्तऐवजी पुराणोक्त पद्धतीने केले जातात. सयाजीरावांनी गो.स. सरदेसाई व काही पंडितांच्या मदतीने वेदोक्त आणि पुराणोक्त या दोन्ही पद्धती समजून घेतल्या. त्यांची खात्री झाली की, वस्तुत: या दोन्हीत कमी-अधिकपणा काहीच नाही; परंतु धर्मपंडित पहिलीला अधिक महत्त्व देतात. केवळ विधी व कर्मकांडात बुडून जाऊन आम्ही धर्माची खरी तत्त्व विसरून गेलो आहोत. समाजातील उच्च-नीचत्वाची जाणीव काढून टाकून धार्मिक दृष्टीने स्थैर्य आणणे हा एकमेव मार्ग आहे. याच

वेळी समाजातील तेढ फार वाढू न देता विवेकाने प्रश्न हाताळावे लागतील, (सयाजीरावांची पत्रे, खंड-२, १९३६, ७२४) हे त्यांनी ओळखले. दुसऱ्या स्वारीहून परत येताच काळ्या पाण्यावरच्या प्रवासाबद्दल धर्मप्रायश्चित घेणे हुकूम काढून बंद केले.

बडोदे देवघर शाखेचे प्रमुख राजाराम गोसावी होते. त्यांचे साथीदार राजारामशास्त्री टोपले सयाजीरावांना गीताग्रंथ वाचून दाखवायचे काम करायचे. सयाजीराव टोपलेशास्त्रींना म्हणाले, ''आम्ही क्षत्रिय आहोत. आमच्या देवघरात वेदोक्त पद्धतीने सुरुवात करता काय?'' शास्त्री हो म्हणाले, ''पण त्याकरिता व्रात्यस्तोम यज्ञ करावा लागेल.'' टोपले वेदोक्त पद्धतीने कर्म करण्यास तयार झाले, हे ऐकून बडोद्यातील कर्मठ सनातनी ब्राह्मणांनी त्यांना विरोध केला. टोपलेशास्त्रींनी नोकरीचा राजीनामा दिला. गो. स. सरदेसाई, रामचंद्र धामणस्कर आणि काही धर्मपंडितांशी सयाजीरावांनी चर्चा केली. १५ ऑक्टोबर, १८९६ ला हुकूम काढला. ''राजवाड्यातील सर्व धर्मकृत्ये वेदोक्त पद्धतीने विजयादशमीपासून सुरू करावीत.'' शिवदत्त जोशी, रविशंकर शास्त्री आणि भोलानाथ शास्त्री या विद्वान पद्धतीने होऊ लागली. १८९८ ला राजपुत्रांची मुंजही केली. काही कर्मठ मंडळींनी विरोध करून पाहिला; मात्र तो क्षीण विरोध टिकला नाही. काहींनी महाराजांचा उघड उपमर्द व आज्ञाभंग केला;

पण या अविवेकाकडे महाराजांनी क्षमावृत्तीने दुर्लक्ष केले. त्यांनी ओळखले होते की, कर्मठांचा हा विरोध अज्ञान आणि स्वार्थामुळेच आहे. इथे महाराजांची दृष्टी धार्मिकपेक्षा अधिक सामंजस्य आणि सामाजिकच दिसून येते.

महाराजांनी या कोणाही मंडळींना शासन केले नाही. सयाजीरावांनी स्वतंत्र धर्मखाते सुरू केले. धर्मविधीचा व्यवसाय करणाऱ्या पुरोहितांनी सरकारकडून नोंदणी करून प्रमाणपत्र घेण्याचा कायदा केला. धर्म, विधींचे पुरेसे ज्ञान पुरोहिताचे आहे का, याची परीक्षा घेऊन पास होणाऱ्यास प्रमाणपत्र (लायसन्स) दिले जाईल. अशांनाच पूजा अर्चा करण्याचा अधिकार असेल. पुरोहिताने यजमानास त्याच्या मातृभाषेत विधीचा अर्थ सांगणे बंधनकारक केले. यावरही पुरोहित वर्गात असंतोष निर्माण झाला. यावर तोडगा म्हणून महाराजांनी मराठा आणि मागासवर्गातील मंडळींसाठी वेगवेगळ्या वैदिक शाळाही सुरू केल्या. शेवटी पुरोहित मंडळींनी हुकुमापुढे नमते घेतले. बडोद्यानंतर वेदोक्त-पुराणोक्त वाद कोल्हापूरमध्ये सुरू झाला. नारायण राजोपाध्ये शाहू छत्रपतींचे पुरोहित होते. त्यांना या कामासाठी वार्षिक ३०,००० रुपयांचे वेतन, दिवाणी-फौजदारी आणि महसूलविषयक काही न्याय-निवाड्यांचे अधिकारही होते. जेव्हा शाहू छत्रपतींच्या लक्षात आले की, कोल्हापुरातील ब्राह्मणवर्ग मराठ्यांकडे करणारे सर्व विधी पुराणोक्त पद्धतीने करत आहेत. याचे कारण ते मराठ्यांना शूद्र मानतात. विरोधकांना एका

फटक्यात नमविणाऱ्या शाहूंनी या ब्राह्मण वर्गाची मनधरणी करत, राजवाड्यात वेदोक्त पद्धतीने विधी करावेत म्हणून सांगू लागले. राजोपाध्ये आणि त्यांना साथ देणाऱ्या सनातनी मंडळी मात्र हट्ट सोडायला तयार नव्हती. प्रो. विजापूरकरांनी या ब्राह्मणमंडळींची बाजू उचलून धरली.

छत्रपती शाहूंनी वेदोक्त प्रकरणात सयाजीराव गायकवाडांची मदत घेतली. बडोद्यात हा प्रश्न महाराजांनी हुशारीने सोडविला होता. राजपुरोहित राजोपाध्ये राजाचेही ऐकत नाही, हे बघून ६ मे, १९०२ रोजी शाहू छत्रपतींनी राजोपाध्यांना नोकरीतून काढून टाकले. त्यांचे दिवाणी, फौजदारी, महसूलविषयक हक्क काढून घेतले. कोल्हापुरात वेदोक्त संघर्ष टोकाचा झाला. प्रो. विजापूरकर, भाऊशास्त्री लेले, धर्मपंडित म्हणू लागले शाहू क्षत्रिय नाही, तर चिंतामण वैद्य आणि वाईचे महादेव शास्त्री शाहूंच्या बाजूने उभे राहिले. बाळ गंगाधर टिळकही या वादात उतरून त्यांनी प्रतिगाम्याचा पक्ष उचलून धरला आणि हा ब्राह्मण-बाह्मणोतर वाद आणखी चिघळत गेला. छत्रपती शाहूंनी यापूर्वी टिळकांच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीला मदत केली होती. ते तहहयात संस्थेचे अध्यक्ष होते, तरी टिळकांनी अपेक्षाभंग केला. समाजपरिवर्तनाच्या संदर्भात टिळकांची भूमिका नेहमीच प्रतिगामी ठरत आलेली दिसते. पुण्यातील डिप्रेस्ड क्लास मिशनच्या अखिल भारतीय अधिवेशनाचे अध्यक्ष सयाजीराव गायकवाड होते.

यावेळी मी माझ्या वैयक्तिक जीवनात स्पृश्य-अस्पृश्य भेदाभेद बाळगणार नाही अशा निवेदनावर सर्वांनी सह्या केल्या; पण टिळकांनी यावर सही केली नव्हती. टिळक म्हणत, समाजसुधारणेत राजसत्तेने कायद्याचा वापर करू नये. याउलट सयाजीरावांनी या दोन्ही गोष्टी सामंजस्याने; पण समर्थपणे केल्या. कोल्हापूर प्रकरणात रेसिडेंट, गव्हर्नर आणि व्हाइसरॉय यांनी छत्रपती शाहूंचा राजोपाध्यांसंबंधीचा निर्णय उचलून धरला. पुढे लोकमान्य टिळकांनी आपली भूमिका बदलली. शाहू राजे व मराठे जात शूद्रच; पण शाहू छत्रपती आहेत म्हणून त्यांना वेदोक्त पद्धतीने संस्कार करण्याचे अधिकार आहेत. या प्रकरणात शाहू छत्रपतींचे गुरू फ्रेझर यांनी शाहूंना सांगितले, सबुरीने प्रकरण हाताळा आणि निर्णय घ्या. नाहीतर महाराष्ट्र ब्राह्मण आणि मराठे असा संघर्ष वाढत जाईल. कोल्हापूरचा हा संघर्ष म्हणजे राजसत्ता आणि धर्मसत्तेतला संघर्ष होता. (जाधव, २०१०, १०९ ते १३१) यामुळे शाहू छत्रपतींना मानसिक, राजकीय आणि आरोग्याच्या दृष्टीने खूप त्रास सहन करावा लागला. याच प्रेरणेतून शाहूंनी मागासलेल्या जाती-जमातीच्या मुलांना शिकवून संघटित केले पाहिजे असे ठरविले. अठरापगड जातींच्या मुलांसाठी कोल्हापूरला वेगवेगळी तेवीस वसतिगृहे सुरू केली. वेदोक्त प्रकरण बडोद्यात अगोदर उद्भवले; पण सयाजीरावांनी हुशारीने हाताळल्याने त्याचे पडसाद बडोद्याबाहेर उमटले नाही. त्या काळात इंग्रज सरकार बडोद्यातील राज्यद्रोही चळवळीमुळे सयाजीरावाकडे 'राष्ट्रद्रोही' राजा म्हणून संशयाने बघत होते.

## ३ : स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग

### ३ : १ ब्रिटिश सत्तेशी सयाजीरावांचा संघर्ष :

सयाजीराव महाराज जेव्हा राज्यकारभार पाहू लागले तेव्हा ईस्ट इंडिया कंपनी आणि बडोद्यामधील मैत्रीचा करार त्यांच्या पाहण्यात आला. आपण ब्रिटिश सरकारचे मांडलिक नसून मित्र आहोत, ही सार्वभौमत्वाची भावना त्यांच्या मनात पक्की रुजली. प्रत्यक्षात ब्रिटिश सरकारचे बडोद्याचे प्रतिनिधी-रेसिडेंट हे संस्थानाकडे एक मांडलिक म्हणूनच बघत. सयाजीरावांनी पहिल्या दहा वर्षांत बडोद्यात शिक्षण, ग्रामपंचायती, ग्रंथालये, सामाजिक सुधारणा, शेती-उद्योग आणि प्रशासनात ज्या लक्षणीय सुधारणा केल्या त्याची चर्चा ब्रिटिश मुलखातही सुरू झाली. दादाभाई नौरोजी, बाळ गंगाधर टिळक, नामदार गोखले, न्या. रानडे, रामकृष्ण भांडारकर ह्या मंडळींचा संबंध बडोद्यात वाढू लागला. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातही सयाजीरावांची मदत आणि उपस्थिती ब्रिटिश सत्तेला आवडत नव्हती. यातून रेसिडेंट आणि सयाजीरावांतील ताणतणाव वाढत गेले. रेसिडेंट बंधने घालू लागले.

विवाहानंतर महाराणी चिमणाबाईंचे चारेक वर्षांत निधन झाले. ह्या दु:खद धक्क्याने सयाजीरावांना निद्रानाशाचा विकार बळावला. दुसऱ्या महाराणीशी विवाह झाला; पण विकार कमी होईना. डॉक्टरांच्या सल्ल्याने थंड हवेच्या ठिकाणी हवापालटसाठी विलायतेत जाऊन आले. हा प्रवास मानवल्याने

दरवर्षी परदेश प्रवास सुरू झाला. या काळात लॉर्ड कर्झन व्हॉइसरॉय म्हणून आले. हिंदुस्थानातील राजे लोकांचे वारंवार परदेशात जाणे, तिथे हौसमौज करणे व्हॉइसराय यांच्या कानावर आले होते. त्यांनी या संदर्भात एक परिपत्रक काढून सर्व राजांना कळविले. राजांचे वारंवार सफरीवर जाणे कर्तव्यच्युती मानली जाईल, खासगी कामासाठी दौरा नसावा, परदेश सफरीसाठी यापुढे मंजुरी घ्यावी लागेल, अशा कडक सूचना 'कर्झन सर्क्युलर'मध्ये होत्या. एवढेच नाही तर प्रवासात चारित्र्य आणि सवयी यावर लक्ष ठेवले जाईल. अशी गर्भित धमकीही दिली होती.

कर्झन यांच्या परिपत्रकातील आशय आणि निर्बंध सयाजीराव महाराजांना आवडत नाही. ते अस्वस्थ झाले. आपल्या सार्वभौम अधिकारावर आणि स्वातंत्र्यावर व्हॉइसराय बंधने आणत आहेत, ही त्यांची भावना तीव्र झाली. महाराजांनी कर्झन यांना पत्र लिहून कळविले, आम्हाला आमच्या संस्थानचे अधिपती समजण्यात येते खरे; पण एखाद्या पगारी नोकराहून कमी दर्जाची वागणूक दिली जाते. (Source Material, १९५८, ५७३)

या काळात सयाजीरावांनी अरविंद घोष या क्रांतिकारक विचारांच्या बंगाली तरुणास बडोद्यास नोकरीस ठेवले होते. आय.सी.एस. लेखी परीक्षा पास झालेल्या अरविंदांनी घोडेस्वराची परीक्षा न देता, ब्रिटिश प्रशासनातील मोठी संधी स्वत: होऊन ठोकरली, हे सयाजीरावांच्या कानावर आले. त्यांनी

घोष यांना लंडन मुक्कामी भेटीस बोलावून खासगी सचिव नेमले. सयाजीराव महाराजांनी पुढे हिमतीने कर्झन यांना कळविले, बडोद्याशी इंग्रज सरकारने दोस्त सरकार म्हणून बरोबरीच्या नात्याने तह केले होते, त्यांची अवस्था आपण एखाद्या वाईट कारकुनापेक्षाही वाईट केली आहे. सर्क्युलर ज्या शब्दात आणि ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आले त्या दोन्ही गोष्टी अयोग्य आहेत. (गायकवाड पत्रे, खंड २, १९२३, ५१२-१३)

कर्झन हे हुशार, मुत्सद्दी; पण मूलत: हट्टी प्रशासक होते. प्रिन्स ऑफ वेल्स इंग्लंडचे बादशहा झाले, हे निमित्त साधून त्यांच्या सन्मानार्थ कर्झन यांनी दिल्ली दरबाराचे आयोजन केले. या दरबारातील सयाजीरावांचे स्वाभिमानी वागणे कर्झन यांना आवडले नाही. सयाजीराव महाराज आणि कर्झन या जहांबाज व्यक्तींची सत्तासंघर्षाची जणू चुरशीची लढाई सुरू झाली. सयाजीरावांना आपल्यापुढे नमवण्याचे लॉर्ड कर्झन यांनी जंगजंग पछाडले; पण त्यांनी तेवढाच आपला महाराष्ट्र बाणा कायम ठेवला, (सरदेसाई, १९५३, २६) असे त्यावेळचे महाराजांचे नोकरीस असलेले प्रसिद्ध इतिहासकार रियासतकार गो.स. सरदेसाईंनी लिहून ठेवले आहे.

## ३ : २ सयाजीरावांची क्रांतिकारकांना मदत :

१८८५ ला अ. भा. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. फिरोजशहा मेहता, बद्रुद्दीन तैयबजी आणि दिनशा वाच्छा या संस्थापक सदस्यांशी सयाजीराव महाराजांचे जवळचे संबंध होते. या कार्यास ते सढळ हाताने मदत करू लागले. अधिवेशनास

स्वत: हजर राहू लागले; बडोदा संस्थानचे अधिकारीही यात भाग घेत. दादाभाई नौरोजी इंग्लंडच्या फिन्सवारी भागातून 'हाऊस ऑफ कॉमन्ससाठी' निवडणुकीसाठी उभे राहिले. निवडणूक खर्चासाठी सयाजीरावांनी ३०,००० रुपयांची मदत केली. नामदार गोखले यांचा विलायत प्रवासखर्चही महाराजांनी केला. बाळ गंगाधर टिळक, न्यायमूर्ती रानडे, लाला लजपतराय या राष्ट्रीय नेत्यांशी महाराजांचे जवळचे संबंध होते.

पुण्यातील गायकवाडवाडा व टिळकांच्या केसरी वृत्तपत्रास भेट देण्याचे महाराजांनी ठरवले; परंतु रेसिडेंट यांनी या प्रकरणी विरोध केला. शेवटी कागदोपत्री काही किंमत दाखवून व्यवहार पूर्ण केला. ही गोष्ट ब्रिटिश सरकारला आवडली नाही. (कामदार, १९९०, प्र. ७)

लंडन येथील इंडिया हाउसचे श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ब्रिटिश सरकार विरुद्ध देशप्रेमी हिंदुस्थानी विद्यार्थ्यांच्या गट केला होता. अरविंद घोष, मुंबईचे केशवराव देशपांडे, सयाजीरावांचे नातेवाईक खासेराव जाधवही त्यात सक्रिय होते. सयाजीरावांनी या मंडळीस मदत केली. एवढेच नाही तर ह्या क्रांतिकारकांना बडोद्यात नोकरी दिली. (रवींद्र, १९८१, ३५) एवढेच नाही तर मादाम कामा, तारकनाथ दास, बिपीनचंद्र पाल या परदेशातील क्रांतिकारकांनाही भेटत, मदत करत, ही गोष्ट ब्रिटिश सरकारच्या नजरेतून लपून राहिली नाही. यातून ब्रिटिश

सरकारने सयाजीरावांच्या प्रत्येक कृतीकडे संशयाने बघायला सुरुवात केली. क्लिव्हलँड नावाच्या हिंदुस्थानच्या सी.आय. डी. प्रमुखास सयाजीरावांच्या राजद्रोही कारवाया शोधण्यासाठी नेमले. एवढेच नाही तर परदेशात स्कॉटलँड यार्ड या ब्रिटिश गुप्तहेर पोलिसांची मदत घेतली जाऊ लागली. (Gaekwad Fatesingrao १९८९, २२५)

हिंदुस्थानातील ब्रिटिश गुप्तहेर सयाजीरावांविरुद्धच्या राजद्रोही घटना शोधू लागले. एकेक प्रकरणाचे कागद वाढत गेले. छापील शंभर पानांहून अधिक आरोपांचा मजकूर व्हॉइसराय लॉर्ड हार्डिंग्जकडे सादर करण्यात आला. व्हॉइसराय यांनी या आरोपांचा अभ्यास करून लंडन येथील भारत मंत्री लॉर्ड क्रू यांना सयाजीरावांविरुद्धचे चोवीस पानांचे टाइप केलेले चार्जशीट तयार केले. आरोपपत्राचा सार असा होता. हिंदुस्थानात सयाजीराव हे एकमेव राजे आहेत जे देशद्रोही मंडळींना मदत करतात. ब्रिटिश सत्तेला डोकेदुखी होऊ शकेल असे त्यांचे अनेक वर्षांचे वर्तन आहे. ज्या गोष्टी संस्थानिकांनी करू नये असे सरकार सांगत आलेय, नेमक्या त्या गोष्टी ते मुद्दाम करत आलेत. बडोदा हे हिंदुस्थानातील देशद्रोही चळवळीचे केंद्र आणि आश्रयस्थान बनले आहे. अरविंद घोष, बाळ गंगाधर टिळक, दादाभाई नौरोजी, प्रो. माणिकराव, लाला लजपतराय, वि.दा. सावरकर या धोकेबाज मंडळींना बडोद्यात आश्रय आहे. या सर्वांना सयाजीरावांची मदत मिळते.

हिंदुस्थान बाहेरील बाबू तारकनाथ, मादाम कामा, श्याम कृष्ण वर्मा, बिपीनचंद्र पाल या ब्रिटिश सत्तेविरुद्ध देशद्रोही चळवळी करणाऱ्यांशी सयाजीरावांचे संधान आहे. देशद्रोही साहित्य छापण्याचे केंद्रही बडोद्यात आहे. (Source Material १९५८, ५६१) आरोपपत्राचा शेवट करताना व्हॉइसराय म्हणाले, सयाजीराव हुशार आहेत; पण ते कोणताही ठोस पुरावा मागे ठेवत नाही. बडोद्यातील प्रो. माणिकरावांचा जुम्मादादा आखाडा देशातील क्रांतिकारकांचे आश्रयस्थान झाले होते एवढेच नाही तर माणिकराव हे महाराज आणि क्रांतिकारी चळवळींच्या लोकांमधील महत्त्वाचा दुवा होते. (महाबळ, गुरुवर्य माणिकराव, १९५७, २०२) सयाजीरावांच्या सूचनेवरून अरविंद घोष, केशवराव देशपांडे, प्रा. माणिकराव आणि खासेराव जाधव यांनी नर्मदासाठी गंगनाथ राष्ट्रीय विद्यालय सुरू केले. स्वामी ब्रह्मानंदांची त्यांना मदत झाली. राष्ट्रप्रेम, शारीरिक शिक्षण, शस्त्रांची उपासना आणि बॉम्ब तयार करण्याचे इथे प्रशिक्षण दिले जाई. (नानासाहेब शिंदे, १९३५, १०५) पुस्तकाच्या कव्हरवर नाव आहे 'वनस्पतीची दवाओ.' लेखकाचे नाव होते नरसिंहभाई पटेल. आत मात्र मजकूर होता बॉम्ब कसा तयार करावा. हे पुस्तक बडोद्यात छापले आहे. बडोद्यात प्रसिद्ध झालेल्या अरविंद घोषांच्या 'भवानी मंदिर' या पुस्तकाचा मजकूरही देशद्रोही ठरविला गेला. चीन, जपान, फ्रान्स, कॅनडा प्रवासातही सयाजीरावांनी देशद्रोही लोकांच्या भेटी घेतल्या, असे या अहवालात नमूद केले आहे. (Secret File, A Banded Box Case १९१०, १०२)

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात फार मोठी कामगिरी करणारे अरविंदे घोष जवळजवळ चौदा वर्षं बडोद्यात नोकरीत होते. काही काळ ते सयाजीराव गायकवाडांचे खासगी सचिवही होते. देशभरातील क्रांतिकारी चळवळीचे केंद्र बडोदा झाले होते. अरविंद घोषांचे बंधू बारिंद्र काही काळ बडोद्यात येऊन राहिले. परत कलकत्ता येथे जाऊन त्यांनी माणिकतोळा उद्यानात बॉम्बस्फोटाची चाचणी पाहण्याचा प्रयोग करून पाहिला. त्यांचा एक मित्र यात ठार झाला. या बॉम्बस्फोटात अरविंद घोषांना राजद्रोही ठरवून अटक करण्यात आली. अरविंदांना मदत करावी म्हणून त्यांचे बडोद्यातील मित्र कॅप्टन माधवराव जाधवांच्या हस्ते सयाजीराव गायकवाड व शाहू महाराजांनी पैशाच्या स्वरूपात मदत केली. या खटल्यास अरविंद बाबूंवर आरोप सिद्ध होऊ शकला नाही.

## ३ : ३ शाहू आणि राष्ट्रीय चळवळ :

शाहू महाराजांच्या जडणघडणीत त्यांचे गुरुवर्य, मार्गदर्शक श्री. फ्रेझर सरांचे फार मोठे योगदान आहे. तसेच मार्गदर्शन महाराजा सयाजीरावांना इलियट सरांकडून प्रदीर्घ काळ लाभले. इलियट हे मूळतः आयरिश. ब्रिटिश आणि आयरिशांचा अनेक वर्षांचा संघर्षाचा इतिहास आहे. हे ध्यानात ठेवून की काय इलियट यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगी राष्ट्रप्रेम आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोषाचे बीजारोपण केले असावे. इलियट यांनी सयाजीरावांच्या मनावर बिंबवले की, ते ब्रिटिश सरकारचे

बरोबरीचे मित्र आहेत, मांडलिक नाहीत. यामुळे सयाजीरावांनी रेसिडेंट आणि कर्झनसारख्या व्हॉइसरायना हिमतीने कळविले, मी तुमचा नोकर नाही.

कोल्हापूरचे दिवाण बहादूर अप्पासाहेब लट्ठे यांनी शाहू छत्रपतींच्या आठवणी १९२४ साली प्रकाशित केल्या. या शाहू चरित्रास गुरुवर्य फ्रेझरांची प्रस्तावना आहे. त्यात ते लिहितात, शाहू महाराजांना प्रसिद्धीची आवड नव्हती; त्यामुळे देशात आणि विलायतेत ते इतर संस्थानिकांच्या मानाने कमी परिचित होते. आपल्या कनिष्ठ थरातील बांधवांनी उन्नती करण्यासाठी जटिल सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी केलेले काम महत्त्वाचे आहे. शाहू महाराजांनी राजद्रोहविरोधी मोहिमेत स्वत:ला झोकून दिले. आपल्या मुलखात होणाऱ्या सरकारविरोधी कृत्यांना तोंड देण्यात समाधान न मानता इतर इलाख्यात इतरत्र झालेली कारस्थाने उघडकीस आणण्यासाठी त्यांनी जे प्रयत्न केले ते ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होते. सरकारनेही त्यांची इमानदारी मान्य करून १९०९ साली त्यांना एकवीस तोफांचा वैयक्तिक सन्मान अर्पण केला. (फ्रेझर, राजर्षी शाहू, २००७,२८८)

१९०९ साली एकीकडे ब्रिटिश सरकार सयाजीरावांच्या राजद्रोही कारवायांविरुद्ध गंभीरपणे १९०९ साली उपाययोजना करीत असताना, त्याच वर्षी शाहू महाराजांच्या इमानदारीसाठी एकवीस तोफांचा सन्मान देणे, ही सरकारची दुटप्पी चालच

दिसून येते आणि फ्रेझर सरांनी आपल्या विद्यार्थ्याला सरकारचा रोष होऊ नये म्हणून एकप्रकारे ही पाठराखणच केलेली दिसते. हिंदुस्थान सरकारचे सी.आय.डी. प्रमुख सर चार्लस् क्लीव्हलँड होते. त्यांनी भारतातील विद्रोही चळवळीच्या बंदोबस्ताचे काम केले. सयाजीराव हे देशद्रोह्यांना मदत करतात, असे सी.आय. डी.चे आरोपपत्र लंडन येथील भारत मंत्र्यांना त्यांनी पाठविले होते. त्या सर चार्लस् क्लीव्हलँड यांना ३१ जुलै, १९१९ ला शाहू छत्रपतींनी पत्र लिहिले. या संदर्भातील शाहूंचे गुप्त पत्र बरेच सांगून जाते.

‘‘आपणास आठवत असेल, काही वर्षांपूर्वी आमच्या पोलिसांनी राजद्रोही टोळीचा कोल्हापुरात छडा लावला. त्यांच्या विरुद्ध कार्यवाही केली. या सर्वांत खतरनाक होता दामू जोशी. आपणास कळविताना मला खेद होतो आहे की, हा दामू आपल्या चार साथीदारांसह आमच्या जेलमधून पसार झाला. यामुळे माझ्या प्रशासनाची अब्रू उघडी पडली. या भागातील राज्यद्रोही चळवळीची चाहूल प्रथम मला लागली आणि मी तात्काळ मेहेरबान सरकारच्या निदर्शनास आणूनही दिले. या राजद्रोह्याविरुद्ध कडक कार्यवाही करून, त्यांचे धागेदोरे कापण्याचा आम्ही प्रयत्न केला. दामू जोशीच्या पलायनामुळे माझी सगळी खबरदारी आणि प्रयत्न आज बेकाम ठरले आहेत. तो माझाही द्वेष करायचा. माझा आणि माझ्या मुलाचा

तो खून करणार आहे, अशी धमकी देत आहे. मी तो आणि त्याच्या टोळीविरुद्ध कार्यवाही केल्याने तो माझ्याविरुद्ध पेटून उठला आहे. त्याचे हे आव्हान आणि आमच्या खुनाची शपथ माझ्यासाठी किती अपमानाची आणि उपमर्द करणारी आहे, हे मी सांगू शकत नाही. अशा संकटसमयी आपणास माझी विनंती आहे, आपण आपल्या सर्वशक्ती आणि अधिकारात मला मदत करण्याची कृपा करावी.'' (शाहू पेपर्स खंड-८,२००१, ५३५)

शाहू छत्रपतींनी राज्यकारभार हाती घेतला त्या सुमारास कोल्हापुरात 'शिवाजी क्लब' ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना काम करत होती. हणमंतराव कुलकर्णी या संघटनेचे प्रमुख होते. बलसाधना आणि शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण हे मूळ उद्देश असले तरी ब्रिटिश सत्तेविरुद्ध कार्यवाही हा महत्त्वाचा भाग होता. कोल्हापुरातील क्रांतिकारकांची ही संघटना राजर्षी शाहू छत्रपतींच्या पाठिंब्यावरच निर्माण झाली होती. या क्लबमध्ये शाहू छत्रपतींचे धाकटे बंधू बापूसाहेब महाराज, दरबारी मंडळींची मुले व काही नातेवाईकही होते. (जाधव, २०१०, १७६) शाहूंचे पहिले चरित्र लिहिणारे अप्पासाहेब लठ्ठे म्हणतात, महाराजांचा १९०१ पर्यंत शिवाजी क्लबला उघड पाठिंबा होता. लोकमान्य टिळकांचा या मंडळींना पाठबळ होते. शाहू छत्रपती आणि लो. टिळक यांचा संबंध याबद्दल सर्वत्र छापलेले आहेच. या पार्श्वभूमीवर शाहूंनी सी.आय.डी. प्रमुखास लिहिलेले पत्र अधिक बोलके आहे.

## ४ : समारोप

महाराज सयाजीराव आणि राजर्षी शाहू हे दोघेही समाजपुरुष लोककल्याण आणि समाजसुधारणांसाठी उत्तम प्रशासनाचा आदर्श होते. दोघेही उदार होते, बुद्धिवादी होते, नवीन प्रयोग करण्यास मागे-पुढे पाहत नसत. सयाजीरावांचा मदतीचा हात अधिक मोकळा होता. वेगवेगळ्या जातींच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतिगृहाचा शाहूंचा प्रयत्न हे चांगले उदाहरण सांगता येईल. शाहू छत्रपतींचे ब्रिटिश सरकारांशी असलेले मित्रत्वाचे संबंध आणि वागणे त्यांच्या समतोल व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवते. या उलट एक व्यासंगी, विद्वानांच्या संगतीत वावरणारे आणि जगभर फिरलेल्या स्वाभिमानी सयाजीराव महाराज ब्रिटिशांची रणनीती पुरती ओळखून आयुष्यभर संयमाने सरकारशी संघर्ष करत राहिले. हे करत असताना त्यांनी रयतेच्या कल्याणाचा चोवीस तास ध्यास घेतला. साहित्य कला, संस्कृती, उद्योग, शेती आणि प्रशासनात बडोदा हे हिंदुस्थानातील अग्रगण्य संस्थान बनवले.

शाहू महाराज यांच्यापूर्वी महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीकडे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी लक्ष दिले. राजर्षी शाहू आणि महाराजा सयाजीरावांची पिंड व प्रकृती मूळत: भिन्न होती. राजर्षी शाहू एखादी गोष्ट करताना एकदम धडक मारत, टक्कर घेऊन प्रतिस्पर्ध्याला चारीमुंडी चीत करण्याची पहिलवानी शक्ती वापरत. याउलट सयाजीराव महाराज एखादा निर्णय घेताना चार तज्ज्ञांचे मत घेत, त्यांच्याकडून अहवाल

मागवत, स्वत: त्याचा विचार करून समतोल निर्णय घेत. तरीसुद्धा विद्या प्रसारक चळवळीचे सयाजीराव पहिले आश्रयदाते (Patron) झाले. पुढे सयाजीरावांच्या कार्यात शाहू महाराजांनी भर घातली. (चव्हाण, २००७, ५१६)

सयाजीरावांचे धोरण सामिलकीचे असल्याने कट्टर हिंदुत्ववादी, सावरकरवादी, फुल्यांचे सत्यशोधक, आर्यसमाजाचे, बुद्धिस्ट आणि पुरोगामी विचारांची माणसे त्यांच्याकडे नोकरीला होती. या सर्वांना बरोबर घेऊन सयाजीराव महाराजांनी सामिलकीच्या धोरणाचा पुरस्कार केला. महाराष्ट्रालाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाला गौरव आणि अभिमान वाटावा असे या दोघांचे कार्य आहे. लॉर्ड कर्झन आणि महाराजा सयाजीरावांचा संघर्ष हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. आपापल्या क्षेत्रात ठाम असलेल्या या दोन व्यक्तींची स्वाभिमान अधिकारासाठीची ही जणू लढाई होती. लॉर्ड कर्झनचा कार्यकाल संपला आणि ते विलायतेला परत जायला निघाले त्यावेळी निरोप समारंभात शाहू छत्रपती आणि कर्झन यांचे बोलणे झाले. कर्झन यांनी शाहूंजवळ महाराजा सयाजीरावांची मोकळ्या मनाने स्तुती करताना म्हटले, ''सयाजीरावांची तुलना एखाद्या शक्तिशाली वाफेच्या इंजिनाशी करता येईल. आणि मी जे सांगतोय ते सत्यच आहे. मी आशा करतो की हिंदुस्थानातील आणखी राजांनी सयाजीरावांच्या चांगल्या कामांचे अनुकरण करावे.'' (शाहू पेपर्स खंड-४, २४२) कर्झनने आपल्या कालखंडात हिंदुस्थानातील राजांवर बंधने

टाकली होती. सयाजीरावांनी यास विरोध केला, तरीही कर्झन यांनी मायदेशी परत जाताना सयाजीरावांच्या कामाचे कौतुक केले, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

●●●

# संदर्भ सूची

**मराठी ग्रंथ**


1) सरदेसाई, गो.स., 1956, श्री सयाजीराव यांच्या आठवणी, पुणे, एस. जगन्नाथ ॲण्ड कंपनी
2) घाटे, विठ्ठलराव, 1961, दिवस असे होते, मुंबई, मौज प्रकाशन.
3) गायकवाड सयाजीराव, 1923, संपादक: सरदेसाई गो.स., बडोदा, महाराजा सयाजीरावांची पत्रे, खंड-2.
4) जाधव, रमेश, 2010, लोकराजा शाहू छत्रपती, पुणे, सुरेश एजन्सी.
5) रवींद्र 1981, लाल कमल, पाँडेचरी, श्री अरविंद सोसायटी.
6) भांड बाबा, 2012, युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, औरंगाबाद, साकेत प्रकाशन प्रा.लि.
7) भांड बाबा, 2013, अ लोकपाळ सयाजीराव, औरंगाबाद, साकेत प्रकाशन प्रा.लि.
8) भांड बाबा, 2012, युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, औरंगाबाद, साकेत प्रकाशन प्रा.लि.

9) गायकवाड, सयाजीराव, 2013 सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड-1, : शिक्षण, धर्म तत्त्वज्ञान, प्रस्तावणा : डॉ. रमेश वरखेडे, औरंगाबाद, साकेत प्रकाशन.

10) गायकवाड, सयाजीराव, 2013, खंड : 2 साहित्य, कला आणि संस्कृती

11) गायकवाड, सयाजीराव, 2013, खंड : 3 राज्य प्रशासन

12) गायकवाड, सयाजीराव, 2014, खंड : 4 शेती, पाणी आणि उद्योग

13) गायकवाड, सयाजीराव, 2014, खंड : 5 दलित आणि पददलित

14) पवार, जयसिंगराव, 2007, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी.

15) चव्हाण, रा.ना., 2007, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी

16) आपटे, दा.ना., 1936, श्री. महाराज सयाजीराव गायकवाड, खंड 1, 2, 3, बडोदे, प्रकाशक-लेखक स्वत:च.

## इंग्रजी ग्रंथ


1) Chavada, V.K., 1955, Gaekwad and The British, A Study of Their Problems (1875-1920), Delhi, University Publishers.
2) Elliot, F.A.H., 1879, The Rulers of Baroda, Baroda, Baroda State Press, Reprint 1934.
3) Government of Bombay, 1958, Source Material for a History of the Freedom Momement in India, Vol. II, 1885-1920, Bombay, Govt. Press.
4) Gaekwad, Fatesingrao, 1989, Sayajirao of Baroda, Bombay, Popular Prakashan.
5) Baroda State, 1936, Report of His Highness The Maharaja Saheb's Trip to Europe (1934-35), Baroda, Baroda Press.
6) Very Secret Confidential Records, 1911, A BANDED BOX CASE, File of Foreign Dept. Govt. of India,
   Aganist Sayajirao Gaekwad, The record is obtained from India House, London, Presently kept in British Library, London.
7) Gaekwad, Sayajirao, 1923, Vol. I Letters of H.

**H. Maharaja Sayajirao Gaekwad, Editor: G. S. Sardesai (1886-1901), Baroda, Huzur Kamdar Office.**

8) **Gaekwad, Sayajirao, 1923, Vol. 2 Letters of H. H. Maharaja Sayajirao Gaekwad.**

9) **Sangave, Vilas, 1978, Rajarshi Shahu Chhatrapati**
**Papapers : Vol One to Nine, 1978 to 2001, Shahu Research Centre, Kolhapur, Shivaji University, Editor. Dr. Vilas Sangve**

10) **Latthe. A.B., 1924, Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati, Maharaia of Kolhapur, Introduction : Sir S.M. Fraser, London.**

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवी असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



❒ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com